विषय : श्री. अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया, शाखा अभियंता, पंचायत समिती राहाता यांना पदावनत (Reversion to the original post) करण्याबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग
आदेश क्रमांक.सा.बां./आस्था-३८०/२०२६
अहिल्यानगर दिनांक २२/५/२०२६

संदर्भ-१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्रमांक सा.बा./ कार्या.१ /४३/१९९६ दिनांक ४/१/१९९७
२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील आदेश क्रमांक/ सा.बा./कार्या.१ / आस्था.२/ ४६/२००२ दिनांक २०/२/२००२
३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्रमांक सा.बा./बांध/कार्या.१ /आस्था.२/ २८६/ २००६ दिनांक २६/७/२००६
४) मा.मुख्य कार्यकीरी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्रमांक कार्या.१/ आस्था.२/५४८/२०१५दिनांक ३०/४/२०१४
५) मा. उपसंचालक तथा सदस्य सचिव,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती अमरावती यांचेकडील आदेश क्रमांक- ST/२०१३/ १२१३५/ ३७९९/ २०२५ दि.२१/८/२०२५
६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील आदेश क्रमांक बांध/ आस्था.२/४९३/ २०२५ दिनांक २७/१२/२०२५
७) मा. अध्यक्ष पदोन्नती समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे दालणात दि. २७/०२/२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक.०१ अन्वये श्री अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया शाखा अभियंता पंचायत समिती राहाता हे दिनांक १७/१/१९९७ रोजी सहाय्यक कनिष्ठ अभियंता यापदावर वेतनश्रेणी रु.१२००-३०-१४४० द.रो- ३०-१८०० मध्ये प्रथम नियुक्तीने हजर झाले आहे

ज्याअर्थी श्री अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया यांना संदर्भ क्रमांक.०२ अन्वये स्थापत्य अभियांत्रीकी सहा. या नव निर्मित पदावर वेतनश्रेणी रु.४०००-१००-६००० मध्ये समावून घेण्यात आले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक.०३ अन्वये श्री अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया शाखा अभियंता पंचायत समिती राहाता यांना स्थापत्य अभियांत्रिकी सहा. या संवर्गातून कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नतीने तात्पूरती नेमणूक करण्यात आली असून ते कनिष्ठ पदावर २७/७/२००६ रोजी हजर झालेले आहेत.

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक.०४ अन्वये श्री अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया शाखा अभियंता यांना राजपत्रित अधिकारी गट-ब ( कनिष्ठस्तर ) दर्जा दिनांक १/४/२०१२ पासून( वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे-४४०० )लागु करणेत आलेला आहे.

ज्याअर्थी श्री अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया शाखा अभियंता पंचायत समिती राहाता यांचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र मा. उपसंचालक तथा सदस्य सचिव,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती अमरावती यांचेकडील आदेश क्रमांक- ST/२०१३/ १२१३५/ ३७९९/ २०२५ दि.२१/८/२०२५ अन्वये अवैध ठरविले आहे.

ज्याअर्थी श्री अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया शाखा अभियंता पंचायत समिती राहाता यांचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र अवैध ठरविल्याने संदर्भ क्रमांक.६ अन्वये श्री. अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया यांना अधिसंख्यपदावर वर्ग करण्यात आले बाबतचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन अदिवासी विकास विभागाकडील परिपत्र क्रमांक.एसटीसी/ १४२०००/ प्र.क्र.४३ कार्या.१०/ दिनांक १३ एप्रिल २००० व शुध्दपत्रक क्रमांक एसटीसी/१४२०००/प्र.क्र. ४३/ कार्या.१० दिनांक-२८ मे २००१ नुसार अनुसुचित जामातीच्या कर्मचारी यांना पदोन्नती देणेपूर्वी त्यांच्या जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करणेत यावी त्या शिवाय त्यांना पदोन्नती देण्यात येवू नये .तसेच महाराष्ट्र शासन समाजिकन्याय व विशेष सहा; विभागाकडील शासन परिपत्र क्रमांक सीबीसी/ १०/२०१० / प्र.क्र.४७ / मावक-५ / दिनांक २६ मार्च २०१० नुसार

सर्व प्रशासकीय विभागाने जात प्रमाणपत्रे पडताळणी समितीकडे पाठवून जातीचे वैध प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व नंतरच पदोन्नती देण्यात यावी असी तरतूद आहे.

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-११२४/प्र.क्र.४५/ आरक्षण-२/१६-ब) दिनांक ७ मे २०२४ नुसार अनुसुचित जामातीचे दावे अवैध ठरलेल्य अधिकारी / कर्मचारी यांचे अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या सेवे संबधी मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या आहेत.त्यामुध्ये अ.क्र.३ (१) अधिसंख्या पदावरील अधिकारी/कर्मचा-यांना सेवा विशेषक तसेच सेवानिवृत्ती विषयक लाभ देण्यात यावेत यामध्ये पदोन्नती व अनुकंपा धोरण यांचा लाभ मिळणार नाही याप्रमाणे तरतूद आहेत.

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक-७ अन्वये - श्री. अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया शाखा अभियंता यांचे जात वैधता प्रमाणपत्र मा.उपसंचालक तथा सदस्य सचिव अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी अमरावती यांचेकडील आदेश क्रमांक- ST/२०१३ / १२१३५ / ३७९९ / २०२५ दि.२१/८/२०२५ अन्वये अवैध ठरविल्याने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्रमांक सा.बा./ बांध/ कार्या.१ / आस्था.२/ २८६/ २००६ दिनांक २६/७/२००६ अन्वये कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती दिलेचा आदेश व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील दर्जोन्नतीचा आदेश क्रमांक /कार्या१/ आस्था.२/५४८/२०१५ दिनांक ३०/४/२०१४ चा आदेश रद्द करुन श्री. अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया यांना स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक यापदावर पदावनत (Reversion to the original post) करणेत येत आहे.

श्री. अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया शाखा अभियंता यांना कनिष्ठ पदावर पदोन्नती दिली नाही असे गृहीतधरुन त्यांची वेतननिश्चीती करण्यात यावी. श्री. अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया यांना पदावनत केलेने त्यांना देय असलेल्या रक्कमेतून वसुल तात्काळ करणेत यावी.

सदर आदेश तात्काळ प्रभावाने लागू करणेत येत असून सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून त्याचा संकेतांक क्र. 202605221130028 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 22-05-2026 12:30:39
आनंद भंडारी (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया शाखा अभियंता पंचायत समिती राहाता यांना मा हितीसाठी व्दारा- उप अभियंता जि.प.सा.बा. उप विभाग राहाता

२/- श्री अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया शाखा अभियंता यांना सदरचा आदेश तात्काळ बजावून दिनांकी स्वाक्षरी घेण्यात यावी व स्वाक्षरी घेतलेली प्रत याकार्यालयास उलट टपाली सादर करावी.

प्रत- उप अभियंता जि.प.सा.बा. उप विभाग राहाता यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत- गट विकास अधिकारी पंचायत समिती राहाता यांना माहितीसाठी
प्रत मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी
प्रत- मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी
प्रत मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर